# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात.

---

**मजीप्रा जाहिरात क्र.१/२०२५**

जा.क्र.मजीप्रा-२०२५/सीआर-४१/आस्था-३, दिनांक : ०४/११/२०२५.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट 'अ', 'ब' आणि 'क' संवर्गातील **अंतर्गत लेखा परिक्षण अधिकारी/वरिष्ठ लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी, उपलेखापाल, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), कनिष्ठ लिपिक/लिपिक-नि-टंकलेखक, सहाय्यक भांडारपाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** ही पदे सरळसेवेने भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाच्या www.mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ पासून ते दिनांक १९ डिसेंबर, २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. या दिनांकानंतर सदर वेबलिंक बंद होईल. वरील पदांकरीता पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.मकसी१००७/प्र.क्र.३६/का-३६, दिनांक १० जुलै २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारही अर्ज करु शकतील. सदर पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येतील. ऑनलाईन परीक्षेची तारीख महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

सरळसेवेने भरावयाच्या पदाकरीता प्राधिकरणाच्या www.mjp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी www.mjp.maharashtra.gov.in या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सविस्तर जाहिरात वाचून त्याप्रमाणे विहित मुदतीत ऑनलाईन (Online) पध्दतीनेच www.mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सरळसेवा भरती २०२५ या टॅबवर आपले अर्ज सादर करावेत. ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. सदर संकेतस्थळास भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरतीप्रक्रिये संबंधित आवश्यक ती अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरतीप्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे प्राधिकारणाच्या www.mjp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर वेळावेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी होण्याचा दिनांक | २०/११/२०२५ |
| २. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | १९/१२/२०२५ |
| ३. | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | १९/१२/२०२५ |
| ४. | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या आधी ७ दिवस |

परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल. परीक्षेचे प्रवेशपत्र हे परीक्षेपुर्वी ७ दिवस आधी www.mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन "Admit Card/Hall Ticket Download" या टॅबवर क्लीक करून प्राप्त (Download) करुन घ्यावे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट 'अ', 'ब' आणि 'क' संवर्गातील **अंतर्गत लेखा परिक्षण अधिकारी/वरिष्ठ लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी, उपलेखापाल, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), कनिष्ठ लिपिक/लिपिक-नि-टंकलेखक, सहाय्यक भांडारपाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** या संवर्गातील भरावयाच्या पदांचा सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतचा तपशिल तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक अर्हता व पात्रता खालील प्रमाणे आहे.

**१. पदसंख्या : सरळसेवेने भरावयाच्या संवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

### १. अंतर्गत लेखा परीक्षण अधिकारी/वरिष्ठ लेखाधिकारी (गट-अ), एकूण पदे : २

| | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

१.१ वेतनश्रेणी : एस-२० : ५६१००-१७७५००.

१.२ पात्रता व अर्हता : Possessing Post Graduate Degree in Higher IInd Class, in Commerce or equivalet qualification of a statutory University with 10 years experience in supervisory capacity and who is not above 45 years of age.

### २. लेखा अधिकारी (गट-ब), एकूण पदे : ३

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

२.१ वेतनश्रेणी : एस-१५ : ४१८००-१३२३००.

२.२ पात्रता व अर्हता : Recruitment to the post of Accounts officer by nomination shall be made from amongst the candidates who possess atleast II nd class Masters Degree Commerce of a statutory University and possess experience in accounting of not less than 5 years in a Commercial Deparment.

### ३. सहाय्यक लेखा अधिकारी (गट-ब), एकूण पदे-६

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ६ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ५ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

३.१ वेतनश्रेणी : एस-१४ : ३८६००-१२२८००.

३.२ पात्रता व अर्हता : Appointment by nomination to the post shall be made by direct recruitment from amongst candidates possessing IInd class degree in Commerce of a statutory University.

### ४. उपलेखापाल (गट-क), एकूण पदे : ३

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

४.१ वेतनश्रेणी : एस-१३: ३५४००-११२४००.

४.२ पात्रता व अर्हता : Appointment by nomination to the post shall be made by direct recruitment from amongst candidates possessing the second class degree in commerce of a statutory University.

### ५. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-ब), एकूण पदे-१४४

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १८ | १० | ४ | १ | ५ | ४ | २ | २९ | १४ | १४ | ४३ | १४४ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १२ | ६ | ३ | १ | ३ | ३ | १ | १९ | ९ | ९ | २८ | ९४ |
| महिला | ५ | ३ | १ | ० | २ | १ | १ | ९ | ४ | ४ | १३ | ४३ |
| खेळाडू | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ७ |
| दिव्यांग | ६ (D,HH-2, OA,OL,LC,DW,AAV-2,SLD-1, MD-1=6) | | | | | | | | | | | ६ |
| अनाथ | १ (संस्थात्मक) | | | | | | | | | | | १ |

५.१ वेतनश्रेणी : एस-१४ : ३८६००-१२२८००.

५.२ पात्रता व अर्हता : स्थापत्य अभियांत्रिकीतील किमान पदविका किंवा पदवी अथवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती.

### ६. कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) (गट-ब), एकूण पदे-१६

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १ | २ | १ | ० | १ | ० | ० | ३ | २ | २ | ४ | १६ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | ११ |
| महिला | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | १ (D,HH-1) | | | | | | | | | | | १ |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

६.१ वेतनश्रेणी : एस-१४ : ३८६००-१२२८००.

६.२ पात्रता व अर्हता : ज्यांनी शासनाच्या महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्रदान करण्यात आलेल्या मॅकेनिकल इंजिनिअरींग किंवा ऑटोमोबाईल इंजिनिअरींग किंवा प्रोडक्शन इंजिनिअरींग किंवा प्रोडक्शन टेकनॉलॉजी यामधील किमान तीन वर्ष कालावधीची पदविका धारण केलेली आहे. अशी व्यक्ती.

### ७. उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब), एकूण पदे -३

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

७.१ वेतनश्रेणी : एस-१५: ४१८००-१३२३००.

७.२ पात्रता व अर्हता :

i. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण; आणि

ii. ज्या उमेदवारांकडे १२० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श.प्र.मि.यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र.

## ८. निम्नश्रेणी लघुलेखक (गट-क), एकूण पदे-६

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ | ६ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | ५ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

८.१ वेतनश्रेणी : एस-१४: ३८६००-१२२८००.

८.२ पात्रता व अर्हता :

I. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण; आणि,

II.ज्या उमेदवारांकडे १०० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श.प्र.मि.यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श.प्र.मि.यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र.

## ९. कनिष्ठ लिपिक/लिपिक-नि-टंकलेखक (गट-क), एकूण पदे-४६

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ० | ३ | २ | ० | ३ | २ | २ | ४ | ६ | ७ | १७ | ४६ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | २ | १ | ० | २ | १ | १ | २ | २ | ३ | ५ | १९ |
| महिला | ० | १ | १ | ० | १ | १ | १ | १ | २ | २ | ५ | १५ |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ३ | ६ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ४ |
| दिव्यांग | २ (D,HH-1, OA,OL,LC,DW,AAV-1=2) | | | | | | | | | | | २ |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

९.१ वेतनश्रेणी : एस-६: १९९००-६३२००.

९.२ पात्रता व अर्हता :

(i) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता आणि

(ii) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रतिमिनिट वेग मर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे.

## १०. सहाय्यक भांडारपाल (गट-क), एकूण पदे- १३

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | २ | १ | ४ | १३ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | ५ |
| महिला | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ७ |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग | १ (LV-1) | | | | | | | | | | | १ |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

१०.१ वेतनश्रेणी : एस-६: १९९००-६३२००.

१०.२ पात्रता व अर्हता :

i. ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे.

ii. ज्यांनी टंकलेखनाची शासकीय प्रमाणपत्र परीक्षा ३० शब्द प्रति मिनिट मराठी किंवा ४० शब्द प्रति मिनिट इंग्रजी उत्तीर्ण केली आहे.

## १०. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (गट-क), एकूण पदे-४८

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | विजा.(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | साशैमाप्रा | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ४ | ३ | २ | १ | २ | २ | १ | ९ | ५ | ५ | १४ | ४८ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | २ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | ५ | १८ |
| महिला | १ | १ | १ | ० | १ | १ | ० | ३ | २ | २ | ४ | १६ |
| माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ६ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ४ |
| दिव्यांग | २ (D,HH-1, OA,OL,LC,DW,AAV-1=2) | | | | | | | | | | | २ |
| अनाथ | ० | | | | | | | | | | | ० |

१०.१ वेतनश्रेणी : एस-८: २५५००-८११००.

१०.२ पात्रता व अर्हता :

I. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण केली आहे आणि

ii. स्थापत्य अभियांत्रिकी पदवी किंवा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (DCE) किंवा तिला समकक्ष अर्हता परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

**२. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :**

२.१ पदसंख्या व प्रवर्गनिहाय आरक्षणामध्ये बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे.

२.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची घोषणा/सुचना वेळोवेळी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत स्पर्धा परीक्षेमधून भरावयाच्या पदांकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

२.३ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि,जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत जाहिरातीत नमूद नसलेल्या मागासप्रवर्ग तसेच समांतर आरक्षणांकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पदे आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

२.४ परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी व त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

२.५ महिला, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन, दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले प्रचलित आदेश/नियमानुसार राहिल.

२.६ एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज सादर करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

२.७ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही- १०१२/ प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.८ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/ विजाभज-१, दिनांक २५ मार्च, २०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेश, शुध्दीपत्रकानुसार जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक, संबंधीत उमेदवार उन्नत व प्रगत व्यक्ती/गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करणेसाठी गृहीत धरण्यात येईल.

२.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/ विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

२.१० आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधी-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२.११ सदर जाहिरात समाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील.

२.१२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी/प्र.क्र.७५/१६-ब, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व ५ जुलै, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२.१३ शासन शुध्दिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

२.१४ अद्ययावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.१५ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी सामाजिक आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदांवरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.१६ अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदांवरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

२.१७ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

२.१८ सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमदेवार संबंधित पदांच्या सेवा प्रवेश नियमातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास ते उमेदवार त्या संबंधित पदांसाठी अर्ज करु शकतील. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा (संबंधित गावातील १५ वर्षे वास्तव्य असल्याबाबतचा) त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.

२.१९ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापुर्वीचे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२.२० सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ठ प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२.२१ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

## ३. खेळाडू आरक्षण :

३.१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीचो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १० ऑक्टोंबर, २०१७, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १७१६/ प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्रावीण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

३.२ प्रावीण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्रावीण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३.३ खेळाचे प्रावीण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, या विषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्रावीण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उप संचालक कार्यालयाकडे परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्रावीण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

३.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्रावीण्य प्रमाणपत्र असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्रावीण्य प्रमाणपत्र प्रमाणित करण्याकरिता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

३.५ परीक्षेकरीता अर्ज सादर करताना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्रावीण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्रावीण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रावीण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

## ४. दिव्यांग आरक्षण :

४.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२ दिव्यांग उमेदवाराने किमान ४० टक्के दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या दिव्यांग उमेदवारांना वैद्यकिय मंडळाने शारिरीकदृष्ट्या पात्र ठरविल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

४.३ दिव्यांग व्यक्तींकरीताचे आरक्षण एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येईल.

४.४ सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतींचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद हे दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येईल.

४.५ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.६ पात्रता संबंधित संवर्ग/पदाकरीता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.७ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रकी-२०१८/ प्र.क्र.४६/आरोग्य ६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या **www.swavlambancard.gov.in अथवा SADM** या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.८ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार/व्यक्ती खालील सवलतीच्या दाव्यास पात्र असतील :

अ) दिव्यांगत्वचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

आ) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यारा तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केलेले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

४.९ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या संवर्ग/पदांच्या बाबतीत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निण्रय क्र.मजीप्रा-११२१/प्र.क्र.२०/पापु-२३, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२४ अन्वये दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | कार्यात्मक आवश्यकता | गट | अपंगत्वाच्या प्रकारानुसार पात्रता निकष |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S,ST,BN,KC,MF,RW,SE,H,C | B | a) D,HH<br>b) OA,OL,CP,DW,AAV<br>c) SLD,MI<br>d) MD involving (a) to (c) above. |
| २ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | S,ST,BN,KC,MF,SE,H,C | B | a) D,HH<br>b) OA,OL,LC,DW,AAV<br>c) SLD,MI<br>d) MD involving (a) to (c) above. |
| ३ | कनिष्ठ लिपिक/ लिपिक-नि-टंकलेखक | S,ST,W,MF,RW,SE,H | C | a) B,LV<br>b) D,HH<br>c) OA,BA,OL,BL,OAL,CP,LC,DW,AAV,MDY.<br>d) ASD (M),SLD,MI.<br>e) MD involving (a) to (d) above. |
| ४ | सहाय्यक भांडारपाल | S,ST,BN,SE,H,MF | C | a) LV<br>b) D,HH<br>c) OA,BA,OL,CP,LC,DW,AAV.<br>d) ASD (M),SLD,MI.<br>e) MD involving (a) to (d) above. |
| ५ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | S,ST,BN,KC,MF,RW,SE,H,C | C | a) D,HH<br>b) OA,OL,LC,DW,AAV<br>c) SLD,MI.<br>d) MD involving (a) to (c) above. |

## ५. अनाथ आरक्षण :

५.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण हे महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ व समक्रमांकाचे शासन पूरकपत्र, दि. १० मे २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

५.२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

५.३ महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक अनाथ- २०१८/ प्र.क्र. १८२/का-०३, दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२ तसेच दि. ०६ एप्रिल, २०२३, अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बाल विकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणांमार्फत वितरीत करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५.४ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे मूळ अधिवास प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक राहिल. नियुक्ती पश्चात ६ महिन्यांच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्यात येईल.

५.५ अनाथांसाठी “संस्थात्मक” व “संस्थाबाह्य" अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील.

१) **संस्थात्मक आरक्षण :** संस्थात्मक आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापुर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थांमध्ये पालन पोषण झाले आहे अशा उमेदवारांचा समावेश असेल. (महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थांमध्ये तसेच महिला व बाल विकास विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करणेत आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये पालन झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल.)

२) **संस्थाबाह्य आरक्षण :** संस्थाबाह्य आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापुर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेबाहेर/नातेवाईकांकडे संगोपन झालेले आहे अशा उमेदवारांचा समावेश असेल.

५.६ महिला व बाल विकास विभाग, शासन पुरकपत्र क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. सबब, सदर जाहिरातीमध्ये अनाथांच्या एका प्रवर्गासाठी पद राखीव असले तरी, दोन्ही प्रवर्गातील (संस्थात्मक/संस्थाबाह्य) उमेदवारांनी अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

६.	**माजी सैनिकांकरीता आरक्षण :**

६.१	सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक साप्रवि क्र.आरटीए-१०७९/४८२/१६-अ, दिनांक १६/४/१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

६.२	जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेखा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६.३	तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

६.४	सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-९०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८ मुंबई, दिनांक ३०/१२/१९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

६.५	सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २ सप्टेंबर, १९८३ अन्वये :-

१)	माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात आणि युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास, असा माजी सैनिक १५ टक्के राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहिल.

२)	युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंतीक्रमाने १५ टक्के आरक्षित, पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहिल. तथापि, उमेदवाराने त्या त्या पदाला लागू असणाऱ्या सेवाप्रवेश नियमानुसार पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

६.६	**आवश्यक प्रमाणपत्र :**

१.	सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र :

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.	जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र :

उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असेल, त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे.

३.	जाहिरातीमध्ये नमूद पदांकरीता नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणे अनिवार्य राहील.

**७. प्रकल्पग्रस्त आरक्षण :**

७.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २० जानेवारी, १९८० व शासन निर्णय क्र.भूकंप १००९/प्र.क्र.२०७/२००९/१६३, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

७.२ प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

७.३ उमेदवाराने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**८. भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :**

८.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ नुसार भुकंपग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

८.२ उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

८.३ उमेदवाराने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**९. पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षण :**

९.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ व क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहिल.

९.२ निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

९.३ सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**१०. महिला आरक्षण :**

१०.१ महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास, शासन निर्णय क्र. महिआ-२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरती निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्ययाची अट मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेली आहे.

१०.२ मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित

असलेलया पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०.३ महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आयुक्त, महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करुन घेणेत येईल.

१०.४ महिलांकरिता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

## ११. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक :

११.१ **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) असलेले आरक्षण :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.राआघो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील, सदरहु आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जाहिरात प्रसिध्द झालेल्या आर्थिक वर्षातील वैध असणारे पात्रता प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

## १२. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास आरक्षण :

सदर जाहिरात  सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग अधिनियम दिनांक २६२/२०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७/२/२०२४ च्या अधिन असेल. या संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील.

## १३. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :

१३.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.mjp.maharashtra.gov.in या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी. तसेच अर्ज भरण्याच्या अनुषंगाने दिलेले “How to apply” परिशिष्ट देखील पहावे.

१३.२ उमेदवारास अर्ज सादर करताना काही समस्या उद्भवल्यास **https://cgrs.ibps.in/** या लिंकवर अथवा **१८०० २२२ ३६६/१८०० १०३४५६६** या हेल्पलाईनवर संपर्क सधावा.

१३.३ ऑनलाईन फी भरणेची अंतिम मुदत दिनांक १९ डिसेंबर, २०२५ पर्यंत राहील.

१३.४ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशीला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे, इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा

तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्यालय, मुंबई यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

१३.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. तसेच वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

१३.६ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक ती माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्याआधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

१३.७ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीची (Grade) यादी सादर करावी.

१३.८ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.

२. अर्ज सादरीकरण

३. शुल्क भरणा

**१३.९ प्रोफाईल निर्मिती/प्रोफाईल अद्ययावत करणे :**

१. www.mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता "सरळसेवा भरती २०२५/Recruitment २०२५ " यावर क्लिक करावे. तद्नंतर पुढे दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login ID व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध भ्रमणध्वनी क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच, सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चूकीचा/अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड रजि (DND) असल्यामुळे संपूर्ण भरतीप्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. उमेदवाराने आपला ई-मेल आयडी व पासवर्ड कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तीसोबत देवाण-

घेवाण करु नये. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

४. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्यामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये सदर नोंदणीकृत ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

५. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर अर्ज कर्त्याने स्वतःच्या Login ID वर Password व्दारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

६. **फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :**

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र/फोटो (रुंदी ३.५ सें.मी. x उंची ४.५ सें.मी.) व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

१) एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा, फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये, फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

४) विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

६) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र/हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## १४. अर्ज सादरीकरण :

१४.१ उमेदवारांना सदर अर्ज www.mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ पासून भरणेसाठी उपलब्ध होतील. उमेदवारांनी **"महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सरळसेवा भरती २०२५/Maharashtra Jeevan Pradhikaran Direct Recruitment २०२५ "** यावर क्लिक करुन पुढे दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.

१४.२ अर्ज नोंदणी करण्यासाठी, "नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा" (Click here for New Registration) टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीव्दारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि वेब स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल, उमेदवाराने तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा, तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि एस.एम.एस. देखील पाठविला जाईल.

१४.३ जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरु शकत नसेल, तर तो "सेव्ह आणि नेक्स्ट" (Save & Next) टॅब निवडून आधीच "एंटर" (Enter) केलेला डेटा जतन करु शकतो. ऑनलाईन अर्ज "सबमिट" (Submit) करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी "सेव्ह आणि नेक्स्ट" (Save & Next) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करुन घ्यावी.

१४.४ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावा आणि त्याची पडताळाणी करावी, कारण "पूर्ण नोंदणी" (Complete Registration Button) बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल करणे शक्य होणार नाही. कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी चूकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१४.५ उमेदवाराचे नाव किंवा त्याचे/तिचे वडील/पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे, जसे ते प्रमाणपत्र/गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते.

१४.६ "तुमचे तपशील सत्यापित करा" (Validate your details) आणि "जतन करा आणि पुढील" (Save & Next) बटणावर क्लिक करुन तुमचा अर्ज जतन करा.

१४.७ फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

१४.८ नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी "पूर्वावलोकन" (Preview) टॅबवर क्लिक करा.

१४.९ आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच “नोंदणी पूर्ण” (Complete Registration) वर क्लिक करा.

१४.१० "पेमेंट" (Payment) टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व "सबमिट" (Submit) बटणावर क्लिक करावे.

**१५. परीक्षा शुल्क व परीक्षा शुल्काचा भरणा करणे :**

**a) परीक्षा शुल्क :**

I. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. १,०००/-

II. मागासवर्गीय/आ.दु.घ/अनाथ/दिव्यांग उमेदवारांसाठी रु.९००/-

II. माजी सैनिक/दिव्यांग माजी सैनिकांना परिक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

IV. उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील,

V. परीक्षा शुल्क ना परतावा (Non Refundable) आहे.

VI. **उमेदवारांस प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एका पेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.**

VII. परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांक/विहीत वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकणा-या उमेदवारांचा संबंधित भरती प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

**b) परीक्षा शुल्क भरणे :**

i. डेबिट कार्ड (Rupay/Visa/Master Card/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड/मोबाईल वॉलेट , युपीआय वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.

ii. व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, एक ई-पावती तयार होईल.

iii. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.

iv. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआउट घेणे आवश्यक आहे.

V. कृपया लक्षात घ्या की, उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**१६. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड (Upload of Photo/Signature) करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे :**

१६.१ ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार छायाचित्र, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

**a) छायाचित्र प्रतिमा (रुंदी ३.५ से.मी. x उंची ४.५ से.मी.) :**

I.छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.

II. हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढ-या पार्श्वभूमीच्या विरुध्द घेतलेले असावे.

III. टोपी आणि गडद चष्मा स्वीकारार्य नाहीत.

IV. परिमाण २०० x ३०० पिक्सेल (प्राधान्य)

V. फाइलचा आकार २०kb-५० kb दरम्यान असावा.

VI. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०० kb पेक्षा जास्त नसावा.

b) **स्वाक्षरी:**

i) अर्जदाराला काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी लागेल. परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्य) फाईलचा आकार १०kb-२०kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार पिक्सेल स्वरुपात २०kb पेक्षा जास्त असणार नाही याची खात्री करा.

ii. कागदपत्रे स्कॅन करणे स्कॅनर रिझोल्यूशन किमान २०० dpi वर सेट करा,रंग True Colour सेट करा.

III. कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया:
ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठीं स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील, संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा" (Upload of Photo/Signature)

c) **तुमचा फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.**

i. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.

ii. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केलेली आहे हे तपासावे.

i. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा छायाचित्र आवश्यक आकाराचे आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.

टिप :- ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीव्दारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी.

**१७. अर्ज भरणेबाबत सर्वसाधारण सूचना :**

१७.१ नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतः काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे.

१७.२. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे, संक्षिप्तपणे (Abbreviations) या अद्याक्षरे (initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या/पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

१७.३ महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला तसेच कागदपत्रे पडताळणी सादर करणे आवश्यक आहे. तसेच एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत, त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला

असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत परीक्षेच्या वेळी तसेच  कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

१७.४ पत्रव्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

१७.५ अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास/न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१७.६ संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

१७.७ वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे, याशिवाय दुसऱ्या इतर कोणत्याही पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

१७.८ उमेदवाराने अर्जात स्वतः चे नाव, सामाजिक प्रवर्ग, समांतर आरक्षण, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

१७.९ उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१७.१० अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१७.११ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.mjp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१७.१२ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

१७.१३ वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित

रकान्यात स्पष्टपणे दावा केलेला नसल्यास, संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

१७.१४ ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ.कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

## १८. कॉल लेटर डाउनलोड करणे :

ऑनलाइन परीक्षेसाठी कॉल लेटर डाउनलोड करण्यासाठी उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या www.mjp.maharashtra.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी लागेल. कॉल लेटर डाउनलोड करण्याची सूचना ईमेल/एसएमएसद्वारे देखील पाठवली जाईल. उमेदवाराने संबंधित लिंकवर क्लिक केल्यानंतर, तो/ती कॉल लेटर डाउनलोड करण्यासाठी विंडोमध्ये प्रवेश करू शकेल. कॉल लेटर डाउनलोड करण्यासाठी उमेदवाराने (i) नोंदणी क्रमांक/रोल नंबर, (ii) पासवर्ड/जन्मतारीख वापरणे आवश्यक आहे. उमेदवाराने कॉल लेटर डाउनलोड करण्यासाठी अलीकडील ओळखण्यायोग्य फोटो कॉल लेटरवर चिकटवावा लागेल जो नोंदणी दरम्यान दिला असेल आणि परीक्षा केंद्रावर (i) कॉल लेटर (ii) खाली दिलेल्या कलम (२२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे आणि कॉल लेटरमध्ये नमूद केल्याप्रमाणे फोटो ओळख पुरावा आणि मूळ आणलेल्या त्याच फोटो ओळख पुराव्याची छायाप्रत घेऊन उपस्थित राहावे लागेल.

**परिक्षा केंद्र :**

१. संबंधित कॉल लेटरमध्ये दिलेल्या ठिकाणी परीक्षा ऑनलाइन घेतली जाईल.

२. परीक्षेचे केंद्र/स्थळ/तारीख/सत्र बदलण्याची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही. तथापि, उमेदवारांस दिलेले कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करण्याचा आणि/किंवा काही इतर केंद्रे देण्याचा अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास आहे.

३. उमेदवाराला त्याने निवडलेल्या केंद्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही केंद्रात नियुक्त करण्याचा अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास आहे.

४. उमेदवार स्वतःच्या जोखमीवर आणि खर्चाने परीक्षा केंद्रावर परीक्षेला बसेल आणि कोणत्याही प्रकारच्या दुखापती किंवा नुकसानीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

५. उमेदवाराने एकदा निवडलेल्या केंद्राची निवड अंतिम असेल.

जर पुरेशा संख्येने उमेदवार "ऑनलाइन" परीक्षेसाठी विशिष्ट केंद्र निवडत नसतील, तर त्या उमेदवारांना इतर कोणतेही सहायक केंद्र देण्याचा किंवा जर उमेदवारांची संख्या एखाद्या केंद्रासाठी ऑनलाइन परीक्षेसाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असेल, तर उमेदवाराला इतर कोणतेही केंद्र देण्याचा अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास आहे.

## १९ परिक्षा केंद्रावर उशिराने उपस्थितीत राहील्यास :

परीक्षेसाठी कॉल लेटरवर नमूद केलेल्या रिपोर्टिंग वेळेनंतर उशिरा रिपोर्ट करणाऱ्या उमेदवारांना परीक्षा देण्याची परवानगी दिली जाणार नाही. कॉल लेटरवर नमूद केलेला रिपोर्टिंग वेळ चाचणी सुरू

होण्यापूर्वीचा आहे. परीक्षेचा कालावधी २ तासांचा असला तरी, उमेदवारांना पडताळणी आणि विविध आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, लॉग इन करणे, सूचना देणे या सारख्या विविध औपचारिकता पूर्ण करण्यासाठी लागणारा वेळ यासह सुमारे ४ तासांचा कालावधी राहील.

## २०. परीक्षा :

२०.१ जाहिरातीत नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card/Hall Ticket) www.mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान ७ (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन Download करुन घ्यावे.

२०.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रत व मुळ ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतः जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्यांची छायाप्रत जमा करावी.

२०.३ ऑनलाईन परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरीता बोलविण्यात येईल.

२०.४ काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये/परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.mjp.maharashtra.gov.in या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

### २०.५ परीक्षा केंद्र :

i. उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रामधून तीन परीक्षा केंद्र निवडावे.

Ii. सदरची परीक्षा ही ऑनलाईन" पध्दतीने संगणकावर विविध सत्रात घेणेत येणार असल्याने उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्रच उमेदवाराला मिळेल याची हमी देता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

iii ऑनलाईन परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ४/५/२०२२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कागदपत्रे पडताळणीकरीता बोलावण्यात येईल.

iv.काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.mjp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

v.उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे. या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

## २१. गुण मिळवण्याची प्रक्रिया :

१. ऑनलाइन परीक्षेचे गुण खालील प्रक्रियेचा अवलंब करून दिले जातील:

(i) चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केल्यानंतर योग्य गुणांवर पोहोचण्यासाठी प्रत्येक वस्तुनिष्ठ परीक्षेत उमेदवाराने अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या विचारात घेतली जाईल.

(ii) उमेदवाराने मिळवलेले योग्य गुण समतुल्य केले जातात जेणेकरून समतुल्य गुण मिळविण्यासाठी वेगवेगळ्या सत्रांमध्ये घेतलेल्या प्रत्येक वस्तुनिष्ठ चाचण्यांमध्ये, काठिण्य पातळीतील किरकोळ फरक, जर असेल तर, लक्षात घेतला जाईल.

कोणत्याही परीक्षेत उमेदवारांनी मिळवलेले गुण हे मूळ फॉर्मशी समतुल्य असतात, हे लक्षात घेऊन सर्व फॉर्मच्या गुणांचे वितरण करण्यात येईल.

(iii) चाचणीनिहाय गुण आणि एकूण गुण दोन अंकांपर्यंत दशांश बिंदूसह नोंदवले जातील.

टीप: कट ऑफ दोन टप्प्यात लागू केले जातील:
i. वैयक्तिक चाचण्यांमधील गुणांवर
ii एकूण गुणांवर

## २२. ओळख पटवणे :

२२.१ परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रांसह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card)/पारपत्र (Passport)/वाहनचालक परवाना (Driving License)/मतदार ओळखपत्र (Voter ID)/आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक/फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहित ओळखपत्र/बार कॉन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक/उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही. सदर उमदेवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

२२.२ **रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.**

२२.३ परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही, ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशावेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि, यामध्ये उमेदवारांची हालचाल व परीक्षेला विलंब होणे यासारख्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. परीक्षेचे फेर आयोजन हे समितीच्या/परीक्षा आयोजित करणा-या संस्थेच्या पूर्ण निर्णयावर अवलंबून राहील, परीक्षेच्या फेर आयोजनासाठी उमेदवारांचा कोणताही दावा राहणार नाही. चाचणी वितरणाची विलंबित प्रक्रिया न स्विकारणारे, हालचालीस नकार देणारे किंवा अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छूक नसलेले उमेदवार सरसकटपणे निवड प्रक्रियेतून बाद ठरविले जातील.

२२.४ परीक्षेशी संबंधीत सर्व बाबींमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात प्राधिकरणाकडून कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

२२.५ उमेदवाराने मूळ प्रवेशपत्राची छायापत्र व ओळखपत्राची छायापत्र परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

२२.६ परीक्षेला उशिरा येण्याबाबत परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्यासाठी वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेसाठी विहित वेळ (जसे ७५, ९० व १२० मिनिटे) देण्यात आलेली असली तरी उमेदवाराचा ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे जमा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

२२.७ निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक/अनुचित प्रकार/गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुध्द करण्यात येणारी कार्यवाही : - उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती/तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(टिप: उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतः ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार), सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांना याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.)

## २३. परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने

२३.१ अनुचित प्रकार करणे किंवा,

२३.२ तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,

२३.३ परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,

२३.४ स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा, स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा, भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,

२३.५ परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी यांच्याशी अरेरावी करणे, उद्धटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे.

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कारवाईस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.**

२३.६ उपरोक्त प्रमाणे दोषी आढळणाऱ्या उमेदवारास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.

२३.७ जर उमेदवार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**२४. परीक्षेचे स्वरुप, दर्जा व निवडीची कार्यपध्दती :**

२४.१ सर्व पदांसाठीचे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणा-या स्पर्धा परीक्षेचे स्वरुप व दर्जा परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

२४.२ सर्व पदांसाठी संगणक प्रणालीद्वारे "ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात परिशिष्ट-अ नूसार घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येईल.

२४.३ परिशिष्ठ 'अ' मधील अ.क्र. १ ते ६ व ९ ते ११ या पदांसाठी संगणक आधारित परीक्षेव्दारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवडसूची (निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

२४.४ परिशिष्ठ अ' मधील अ.क्र. ७ व ८ (उच्चश्रेणी लघुलेखक) व (निम्नश्रेणी लघुलेखक) या पदांसाठी संगणक आधारित परीक्षेमध्ये (Computer Based Online Examination) किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणी घेण्याबाबतचे स्थळ, दिनांक व वेळापत्रक स्वतंत्रपणे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवडसूची (निवड यादी व प्रतिक्षा यादी) तयार करण्यात येईल.

२४.५ ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

२४.६ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे परीक्षेची प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका याची प्रत उमेदवारांना मिळणार नाही.

२४.७ ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका फेरतपासणी करण्यात येणार नाही, याबाबत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे प्राधिकरणाशी अथवा कंपनीशी (IBPS) संपर्क साधू नये.

## परिशिष्ट-अ

| अ. क्र. | पदनाम | भाग-१ मराठी | भाग-२ इंग्रजी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ बौध्दिक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) | शारीरिक क्षमता चाचणी/ व्यावसायिक चाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | अंतर्गत लेखा परीक्षण अधिकारी/वरिष्ठ लेखा अधिकारी | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | -- |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | लेखा विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| २ | लेखा अधिकारी | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | -- |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | लेखा विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| ३ | सहाय्यक लेखा अधिकारी | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | -- |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | लेखा विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| ४ | उपलेखापाल | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | -- |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | लेखा विषयक व पदवी दर्जाचे प्रश्न | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | -- |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका दर्जाचे प्रश्न | | | | -- |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |

| अ. क्र. | पदनाम | भाग-१ मराठी | भाग-२ इंग्रजी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ बौद्धिक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) | शारीरिक क्षमता चाचणी/ व्यावसायिक चाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ६ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | १०० | २०० | १२० मिनिटे | |
| ७ | उच्चश्रेणी लघुलेखक | १५ | १५ | १५ | १५ | -- | | | | |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | -- | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | -- | ६० | १२० | ७५ मिनिटे | व्यावसायिक चाचणी ८० गुण |
| ८ | निम्नश्रेणी लघुलेखक | १५ | १५ | १५ | १५ | -- | | | | |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | -- | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | -- | ६० | १२० | ७५ मिनिटे | व्यावसायिक चाचणी ८० गुण |
| ९ | कनिष्ठ लिपिक/लिपिक-नि-टंकेलेखक | २५ | २५ | २५ | २५ | -- | | | | |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | -- | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | -- | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| १० | सहाय्यक भांडारपाल | २५ | २५ | २५ | २५ | -- | | | | |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | -- | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | -- | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १० | १० | १५ | १५ | ५० | | | | |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका दर्जाचे प्रश्न | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | -- | १०० | २०० | १२० मिनिटे | -- |

टिप : परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार आहे. एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागल्यास (In case the examination is held in more than one session) प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येतील. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील

| |
|---|
| प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठिण्यता तपासण्यात येऊन त्याचे समानीकरण करणेचे (Normalization) पध्दतीने गुणांक निश्चित करुन निकाल जाहीर करणेत येईल. सदर Normalization सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. |

## २५. पात्रता :

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| उमेदवार भारताचा नागरिक असावा. | |
| उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. | अधिवास (Domicile) प्रमाणपत्र आवश्यक |
| सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रं. मकसी१००७/प्र.क्र.३६, दिनांक १० जुलै, २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षांचे वास्तव्य असल्याचा/रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. |

## २६. वयोमर्यादा :

(i) परिशिष्ट-अ मधील अ.क्र.२ ते ११ करीता पदांची वयोमर्यादा :

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | प्रविण्यप्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | | दिव्यांग | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | पदवीधर अंशकालीन |
| | | | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | दिव्यांग माजी सैनिक | | | | |
| अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | वर्ग अ ते ब -१९ वर्ग क- १८ वर्षे | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+ सेवा कालावधी + ३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी + ३ वर्षे | ४५ | ४५ | ४५ | ४५ | ५५ |

a. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सनिव२०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दि. ०३ मार्च २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार, शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दि. ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी दि. २५/०४/२०१६ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत (खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्षे) दोन वर्षे इतकी शिथिलता (खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्षे व मागासप्रवर्गासाठी ४५ वर्षे) अनुज्ञेय करण्यात आली आहे.

b. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कायम आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४८ वर्षे इतकी शिथिलक्षम राहिल.

c. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचा-यांसाठी गट-क मधील नियुक्तीसाठी वय ४५ वर्षे इतके अनुज्ञेय राहिल.

## २७. जाहिरातीच्या दिनांकास वय :

२७.१ दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे उमेदवाराचे वय ग्राह्य धरण्यात येईल.

२७.२ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

## २८. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र :

अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क). भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय उमेदवारांना संबंधित आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

## २९. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन नियुक्ती वेळेस हजर होताना विवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहिल. प्रतिज्ञापनामध्ये नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. या नियमातील व्याख्येनूसार लहान कुटुंब याचा अर्थ दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे.

## ३०. निवडप्रक्रिया :

३०.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रते विषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

३०.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा, शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय/तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

## ३१. दिव्यांग व्यक्तींसाठी मार्गदर्शक सूचना :

३१.१ दृष्टिहीन व ज्यांच्या लेखन गतीवर कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाईन परीक्षे दरम्यान खालील मुद्दा ३१.११ आणि ३१.१२ मध्ये नमूद मर्यादेच्या अधीन राहून लेखनिकाचा वापर करू शकतात. जेथे लेखनिक वापरला जातो अशा सर्व प्रकरणांसाठी खालील नियम लागू होतील.

३१.२ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी यांना स्पर्धा परीक्षेस बसताना लेखनाची अडचण तसेच लेखनाची गती कमी असल्यास त्यांनी केलेल्या मागणीनुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २ (आर) नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तीच्या वर्गवारीमधील अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित/नसलेली)/मेंदु वा पक्षाघात असलेल्या दिव्यांग परिक्षार्थीना लेखनिक यांची सुविधा वापरू शकतात.

३१.३ उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

३१.४ लेखनिक यांची शैक्षणिक पात्रता सदर परिक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

३१.५ उमेदवाराने निवडलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवा वापरण्यास पात्र व इच्छित उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद नसल्यास नंतर लेखनिक वापरण्याची केलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३१.६ लेखनिक म्हणून सेवा देणारी व्यक्ती एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून सेवा देऊ शकणार नाही, त्याबाबत उमेदवाराने आवश्यक ती काळजी घ्यावी.

३१.७ लेखनिक उपरोल्लिखित सर्व विहित अर्हतेचे निकषांची पूर्तता करीत असल्याचे हमीपत्र व आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र उमेदवाराने परीक्षा सुरु होण्यापूर्वी पर्यवेक्षक/केंद्र प्रमुख यांचेकडे द्यावे लागेल. तद्नंतर जर उमेदवार किंवा लेखनिक विहित अर्हतेच्या निकषांची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल. (उमेदवाराने विहित प्रमाणपत्र व हमीपत्र सादर करणे अनिवार्य राहील).

३१.८ जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात त्यांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनिटे अतिरिक्त वेळ भरपाई म्हणून देण्यात येईल. परीक्षेदरम्यान लेखनिकाने स्वतःहून प्रश्नांची उत्तर देऊ नयेत. असे कोणतेही वर्तन आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

३१.९ उमेदवारांना दिलेल्या भरपाईचा वेळ संगणक प्रणालीवर आधारित असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज करताना लेखनिकाची सेवा घेणार असल्याचे नमूद केलेले आहे. अशा नोंदणीकृत उमेदवारांनाच अतिरिक्त वेळ देण्यात येईल. भरपाईच्या वेळेसाठी नोंदणीकृत नसलेल्या अन्य उमेदवारांना ऐनवेळी अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

३१.१० परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, संबंधित उमेदवाराचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षा संपन्न झाल्यानंतरही जर परीक्षेदरम्यान लेखनिकाच्या सेवांचा स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वापर केल्याचे परीक्षा प्रशासनास आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

३१.११ **अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :** अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात (किमान ४०% दिव्यांगत्व) असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रामध्ये तसे नमूद केलेले असल्यास त्यांना प्रति तास २० मिनिटे इतका अतिरिक्त वेळ दिला जाईल.

३१.१२ **दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :** दृष्टिहीन (ज्यांना ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व आहे) उमेदवार परीक्षेसाठी मॅग्निफाइड फॉन्टची सुविधा उपलब्ध करण्याचा पर्याय घेऊ शकतात. तसेच अशा उमेदवारांना भरपाई म्हणून दर तासासाठी अतिरिक्त २० मिनिटे देण्यात येतील.

३१.१३ सदरची मार्गदर्शक तत्वे केंद्र/महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचनांनुसार/ निर्णयानुसार असुन त्यामध्ये शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

**३२. निवडसुचीची कालमर्यादा :**

३२.१ निवड समितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी विधीग्राह्य राहिल, तद्नंतर ही निवडसूची व्यपगत होईल, भरती प्रक्रियेदरम्यान शासनाने भरतीप्रक्रिया, निवडसुची, प्रतिक्षासुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

३२.२ निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तदतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र/अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता/अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या-त्या प्रवर्गाच्या निवडसुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून निवडसुचीच्या कालमर्यादेत वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रियेदरम्यान शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवडसुची, प्रतिक्षासुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

**३३. निवड पध्दत :**

३३.१ परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस.एम.एस. (SMS) व्दारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस देऊन माहिती कळविण्यात येईल. त्यामुळे अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे आवश्यक राहील.

३३.२ पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

३३.३ परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३३.४ उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे, ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये जबाबदाऱ्या विचारात घेवून उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल.

३३.५ पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल तसेच ई-मेल अथवा मोबाईलवर मेसेजव्दारे सुचना देण्यात येतील.

निवडसूची ही प्रवर्गनिहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढील प्रमाणे असेल.

| प्रवर्ग निहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १००% किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५०% किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३०% किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते |
| ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५% |

**३४. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :**

३४.१ ज्या पदांकरिता प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहीत केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

३४.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर भाषा संचालनालयाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

३४.३ शासन नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांना जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकिय तपासणी करुन घ्यावी लागेल.

३४.४ चारित्र्य-पुर्व चारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधीत उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

३४.५ संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र. ६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च २००३ तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि.) क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ तसेच शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार/शुध्दीपत्रक/शासन निर्णयानुसार संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहील.

३४.६ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र. ५७/का.२८, दि. ३० मे, २०२३ अन्वये शासन सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिक उमेदवारांना गट-क संवर्गातील ज्या पदासाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे अशा सर्व पदांवर नियुक्ती होणा-या माजी सैनिक कर्मचा-यांना नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत व दोन संधीत या विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि, सदर मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची पुढील वेतनवाढ रोखण्यात येईल.

३४.७ उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक पदावर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक) यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/ मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली, १९९१ अथवा त्यानंतर शासनाकडून

वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा नुसार भाषा संचालनालयाची विहीत गतीची मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखनाची परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३४.८ निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होते वेळी परिविक्षाधीन पदावर नियुक्ती केल्यापासून तीन वर्षापर्यंत प्राधिकरणाच्या सेवेचा राजीनामा देणार नाही किंवा नोकरी सोडून जाणार नाही, तसेच तीन वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडल्यास, सहा महिन्याच्या पूर्ण वेतना (Gross Payment) एवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यास बांधिल राहील असे बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे. सेवेत रुजू झालेनंतर उमेदवारांना प्राधिकरणाच्या सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास, एक महिन्याची पूर्व सूचना देणे व व्यवस्थापनाची पूर्व मंजूरी घेणे त्यांच्यावर बंधनकारक राहिल.

३४.९ या जाहिरातील संवर्गात नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्रातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयात कोठेही नियुक्तीने पदस्थापना देण्यात येईल व त्या नियुक्तीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील.

## ३५. सर्वसाधारण सूचना :

३५.१ ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्यांना याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

३५.२ अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्त्वावर केलेल्या अंशकालीन सेवेच्या कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही. सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दि. ०३ जुलै, २००४ नुसार अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

३५.३ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील, शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर, २०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ०६ महिन्यांचे आत, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधीत उमेदवारांना सेवेतून कमी करण्यात येईल.

३५.४ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३५.५ ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे यापरीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतर उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल. अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिका-यांकडून पडताळणी/तपासणीच्या आधारे (आवश्यकतेनुसार) पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. मूळ प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वीच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

३५.६ शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

३५.७ ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

३५.८ माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे भरतीसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३५.९ खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार करणेत येईल.

३५.१० जाहिराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. जाहिरातीतील तांत्रिक/लेखनिकी चुकांचा फायदा उमेदवारांना घेता येणार नाही.

३५.११ पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय/शासन शुध्दीपत्रक/शासन अधिसूचना यानुसार सदर पदभरती नियम/निकषामध्ये बदल होऊ शकतो.

३५.१२ शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी बंधनकारक असतील.

३५.१३ अर्ज भरताना एखादा तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यास किंवा तशी परिस्थिती उद्भवल्यास उमेदवारांनी इन्स्टीट्यूट ऑफ बैंकिंग पर्सोनेल सिलेक्शनच्या **१८०० २२२ ३६६/१८०० १०३४५६६** या क्रमांकावर तसेच https://cgrs.ibps.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

३५.१४ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांक/विहीत वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

३५.१५ कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ. बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळुन आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेली ओळखीचा पुरावा व स्वतःचे आधार कार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

३५.१६ पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर SMS किंवा E-mail व्दारे निवडसूची/प्रतिक्षा यादी व नियुक्तीबाबत कळविण्यात येईल. तसेच प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर निवडसूची/प्रतिक्षा यादी/नियुक्तीची यादी प्रसिध्द करण्यात येईल.

३५.१७ सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर पुर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राखून ठेवत आहे.

३५.१८ सदर जाहिरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या www.mjp.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(अमगोथू श्री रंगा नायक,भा.प्र.से.)
सदस्य सचिव
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

# Annexure-B

**HOW TO APPLY**

**DETAILED GUIDELINES/PROCEDURES FOR**

A. **APPLICATION REGISTRATION**
B. **PAYMENT OF FEES**
C. **DOCUMENT SCAN AND UPLOAD**

**Candidates can apply online only from 20.11.2025 to 19.12.2025 and no other mode of application will be accepted.**

**IMPORTANT POINTS TO BE NOTED BEFORE REGISTRATION**

Before applying online, candidates should-

**(i)** **scan their :**
- **photograph (4.5cm × 3.5cm)**
- **signature (with black ink)**
- **left thumb impression (on white paper with black or blue ink)**
- **a hand written declaration (on a white paper with black ink) (text given below) ensuring that the all these scanned documents adhere to the required specifications as given in Annexure III to this Advertisement.**

**(ii)** **Signature in CAPITAL LETTERS will NOT be accepted.**

**(iii)** **The left thumb impression should be properly scanned and not smudged. (**If a candidate is not having left thumb, he/she may use his/ her right thumb for applying.)

**(iv)** **The text for the hand written declaration is as follows –**
***"I, ________(Name of the candidate), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required."***

**(v)** **The above mentioned hand written declaration has to be in the candidate's hand writing and in English only. If it is written and uploaded by anybody else or in any other language, the application will be considered as invalid. (**In the case of Visually Impaired candidates who cannot write may get the text of declaration typed and put their left hand thumb impression below the typed declaration and upload the document as per specifications.)

(vi) **Keep the necessary details/documents ready to make** Online Payment **of the requisite application fee/ intimation charges**

**(vii)** **Have a valid personal email ID and mobile no., which should be kept active till the completion of this Recruitment Process. Bank may send intimation to download call letters for the Examination etc. through the registered e-mail ID. In case a candidate does not have a valid personal e-mail ID, he/she should create his/her new e-mail ID and mobile no. before applying on-line and must maintain that email account and mobile number.**

**(viii)** DigiLocker has been integrated with the online application form. The candidate may provide access to issued credentials/documents (Aadhaar, Educational Qualification Documents etc.) and information (Name, Date of Birth, Gender etc.) through DigiLocker on voluntary basis.

**APPLICATION FEES/ INTIMATION CHARGES (NON REFUNDABLE) PAYMENT OF FEE ONLINE** : -

Bank Transaction charges for Online Payment of application fees/intimation charges will have to be borne by the candidate.

**A. Application Registration**

1. Candidates to go to the Maharashtra Jeevan Pradhikaran website and under Tab 'Maharashtra Jeevan Pradhikaran Direct Recruitment 2025' click on the option

"**APPLY ONLINE**" which will open a new screen.

2. To register application, choose the tab "**Click here for New Registration**" and enter Name, Contact details and Email-id. A Provisional Registration Number and Password will be generated by the system and displayed on the screen. Candidate should note down the Provisional Registration Number and Password. An Email & SMS indicating the Provisional Registration number and Password will also be sent.
3. In case the candidate is unable to complete the application form in one go, he / she can save the data already entered by choosing "SAVE AND NEXT" tab. Prior to submission of the online application candidates are advised to use the "SAVE AND NEXT" facility to verify the details in the online application form and modify the same if required. Visually Impaired candidates should fill the application form carefully and verify/ get the details verified to ensure that the same are correct prior to final submission.
4. Candidates are advised to carefully fill and verify the details filled in the online application themselves as no change will be possible/ entertained after clicking the COMPLETE REGISTRATION BUTTON.
5. The Name of the candidate or his /her Father/ Husband etc. should be spelt correctly in the application as it appears in the Certificates/ Mark sheets/Identity proof. Any change/alteration found may disqualify the candidature.
6. Validate your details and Save your application by clicking the 'Validate your details' and 'Save & Next' button.
7. Candidates can proceed to upload Photo & Signature as per the specifications given in the Guidelines for Scanning and Upload of Photograph and Signature detailed under point "C".
8. Candidates can proceed to fill other details of the Application Form.
9. Click on the Preview Tab to preview and verify the entire application form before 'COMPLETE REGISTRATION'.
10. Modify details, if required, and click on 'COMPLETE REGISTRATION' ONLY after verifying and ensuring that the photograph, signature uploaded and other details filled by you are correct.
11. Click on 'Payment' Tab and proceed for payment.
12. Click on 'Submit' button.

B. **PAYMENT OF FEES**

**ONLINE MODE**

1. The application form is integrated with the payment gateway and the payment process can be completed by following the instructions.
2. The payment can be made by using Debit Cards (RuPay/Visa/MasterCard/Maestro), Credit Cards, Internet Banking, IMPS, Cash Cards/ Mobile Wallets.
3. After submitting your payment information in the online application form, PLEASE WAIT FOR THE INTIMATION FROM THE SERVER. DO NOT PRESS BACK OR REFRESH BUTTON IN ORDER TO AVOID DOUBLE CHARGE
4. On successful completion of the transaction, an e-Receipt will be generated.
5. Non-generation of 'E-Receipt' indicates PAYMENT FAILURE. On failure of payment, Candidates are advised to login again using their Provisional Registration Number and Password and repeat the process of payment.
6. Candidates are required to take **a printout of the e-Receipt** and online Application Form containing fee details . **Please note that if the same cannot be generated, online transaction may not have been successful**.
7. For Credit Card users: All charges are listed in Indian Rupee. If you use a non-Indian credit card, your bank will convert to your local currency based on prevailing exchange rates.
8. To ensure the security of your data, please close the browser window once your

transaction is completed.

9. **There is facility to print application form containing fee details after payment of fees.**

C. Guidelines for scanning and Upload of Documents :

Before applying online a candidate will be required to have a scanned (digital) image of his/her photograph, signature, left thumb impression and the hand written declaration as per the specifications given below.

Photograph Image: (4.5cm × 3.5cm) :

- Photograph must be a recent passport style colour picture.
- Make sure that the picture is in colour, taken against a light-coloured, preferably white, background.
- Look straight at the camera with a relaxed face
- If the picture is taken on a sunny day, have the sun behind you, or place yourself in the shade, so that you are not squinting and there are no harsh shadows
- If you have to use flash, ensure there's no "red-eye"
- If you wear glasses make sure that there are no reflections and your eyes can be clearly seen.
- Caps, hats and dark glasses are not acceptable. Religious headwear is allowed but it must not cover your face.
- Dimensions 200 x 230 pixels (preferred)
- Size of file should be between 20kb–50 kb
- Ensure that the size of the scanned image is not more than 50kb. If the size of the file is more than 50 kb, then adjust the settings of the scanner such as the DPI resolution, no. of colours etc., during the process of scanning.

Photograph Capture :

- In addition to the above photograph, candidates will also be required to capture and upload their live photograph either by using webcam or mobile phone.
- On selecting “Capture Photo” option, candidates’ webcam will be activated allowing them to click their picture, which will get auto uploaded in the application form.
- On selecting “Click here to Scan” option, candidates can use their mobile phone to scan the QR code, which will redirect to a website, allowing to click photograph on their mobile phone. On selecting the taken picture, photograph will get auto uploaded in the application form.

Do’s and Don’ts of Photo Capture :

Dos:

- Ensure the photo is captured against a light coloured, preferably white background and there is adequate light.

- Look straight at the webcam/ camera. Photograph should be of passport size.

Don’ts

- Small size photograph not to be clicked/uploaded.
- Coloured glasses or sunglasses/Cap should not be worn.
- Shadow on face/not facing camera/ distorted face/ face covered with mask/blurred image.
- Photo not taken in dark/improper background.

Signature, left thumb impression and hand-written declaration Image:

- The applicant has to sign on white paper with Black Ink pen.
    - Dimensions 140 x 60 pixels (preferred)
    - Size of file should be between 10kb – 20kb for signature and 20kb - 50kb for left thumb impression.
    - Ensure that the size of the scanned image is not more than 20kb
- The applicant has to put his left thumb impression on a white paper with black or blue ink.
    - File type: jpg / jpeg
    - Dimensions: 240 x 240 pixels in 200 DPI (Preferred for required quality) i.e 3 cm * 3 cm (Width * Height)
    - File Size: 20 KB – 50 KB
- The applicant has to write the declaration in English clearly on a white paper with black ink.
    - File type: jpg / jpeg
    - Dimensions: 800 x 400 pixels in 200 DPI (Preferred for required quality) i.e 10 cm * 5 cm (Width * Height)
    - File Size: 50 KB – 100 KB
- The signature, left thumb impression and the hand written declaration should be of the applicant and not by any other person.
- If the Applicant’s signature on the attendance sheet or Call letter, signed at the time of the examination, does not match the signature uploaded, the applicant will be disqualified.
- Signature / Hand written declaration in CAPITAL LETTERS shall NOT be accepted.

Scanning the documents:

- Set the scanner resolution to a minimum of 200 dpi (dots per inch)
- Set Colour to True Colour
- File Size as specified above
- Crop the image in the scanner to the edge of the photograph/signature/ left thumb impression / hand written declaration, then use the upload editor to crop the image to the final size (as specified above).

- The image file should be JPG or JPEG format. An example file name is: image01.jpg or image01.jpeg. Image dimensions can be checked by listing the folder files or moving the mouse over the file image icon.
- Candidates using MS Windows/MSOffice can easily obtain documents in .jpeg format by using MS Paint or MSOffice Picture Manager. Scanned documents in any format can be saved in .jpg / .jpeg format by using 'Save As' option in the File menu. Size can be adjusted by using crop and then resize option.

Procedure for Uploading the documents :

- While filling in the Online Application Form the candidate will be provided with separate links for uploading Photograph, signature, left thumb impression and hand written declaration
- Click on the respective link "Upload Photograph / signature / Upload left thumb impression / hand written declaration"
- Browse and Select the location where the Scanned Photograph / signature / left thumb impression / hand written declaration file has been saved.
- Select the file by clicking on it
- Click the 'Open/Upload'
- If the file size and format are not as prescribed, an error message will be displayed.
- Preview of the uploaded image will help to see the quality of the image. In case of unclear / smudged, the same may be re-uploaded to the expected clarity /quality.